**प्रधानमंत्री आवास योजना- ग्रामीण (Pradhan Mantri Awaas Yojana-Gramin) (सन २०१६-१७ पासून जि.ग्रा.वि.यंत्रणेमार्फत सुरू आहे)**

| अ. क्र. | घरकुल योजनेचे नांव | योजना कोणत्या विभागामार्फत आहे | योजनेचा उद्देश | अटी व शर्ती | घरकुलाचे क्षेत्रफळ | योजनेतील एकूण टप्प्यानुसार हप्त्यांची संख्या, हप्ता रक्कम व एम आर ई जी एस मजुरी रक्कम | | | अनुदान व फायदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | हप्ता क्रमांक | रक्कम रूपये | टप्पा | |
| १ | प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण | ग्रामविकास विभाग | सामाजिक, आर्थिक व जात सर्वेक्षण-२०११ मधील प्राधान्यक्रम यादीतील कच्चेघर व बेघर कुटुंबांना निवारा उपलब्ध | १. लाभार्थी निवड सामाजिक,आर्थिक व जात सर्वेक्षण-२०११ मधील प्राधान्यक्रम यादीतुन ग्रामसभेमार्फत प्रपत्र -ब व प्रपत्र-ड मध्ये (पात्र लाभार्थीची यादी) प्राप्त यादीतुन ग्रामसभेच्या ठरावासह करण्यांत यावी | २५ चौ.मीटर (२६९ चौरस फुट) | १ | १५०००/- | घरकुल मंजुर झाल्यावर पहिला हप्ता | सदर योजनेतंर्गत केंद्र शासनाकडून ६० % अनुदान व राज्य शासनाकडून ४०% अनुदान प्राप्त होते केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार घरकुलांची किंमत रक्कम रु. १,२०,०००/- निश्चित करण्यात आलेली आहे. रक्कम रु. १,२०,०००/- पैकी नवीन घरकुलाच्या बांधकामासाठी अनुदान उपलब्ध करुन देण्यात येते यामध्ये * रु.७२,०००/- केंद्र शासन हिस्सा ६०% * रु.४८,०००/- राज्य शासन ४०% एकूण घरकुलाची किंमत रक्कम रुपये :- १,२०,०००/- बँक खात्यामध्ये राज्य शासनाकडून PFMS व्दारे ऑनलाईन जमा करण्यात येते. |
| | | | | २.यापूर्वी कोणत्याही घरकुल योजनेचा लाभ घेतलेला नसावा. | | २ | ७००००/- | जोतापुर्ण झाल्यानंतर (पायाबांधकामपुर्ण) | वरील अनुदान व्यतिरिक्त महात्मा गांधी रोजगार हमी योजनेतुन अभिसरणाअंतर्गत शासनाच्या प्रचलित मजुरीच्या दरानुसार अकुशल मजुरी देण्यांत येते. सदरची मजुरी घरकुलाचे सुरूवातीला कामसुरू असतांना कामाच्या टप्प्यानुसार वेळेवरच ग्रामपंचायतीच्या ग्राम रोजगार सेवकांस जाँबकार्ड क्रामंक,बँकखाते पुस्तकाची व आधार कार्डची छायांकित प्रत |

| अ. क्र. | घरकुल योजनेचे नांव | योजना कोणत्या विभागामार्फत आहे | योजनेचा उद्देश | अटी व शर्ती | घरकुलाचे क्षेत्रफळ | योजनेतील एकूण टप्प्यानुसार हप्त्यांची संख्या, हप्ता रक्कम व एम आर ई जी एस मजुरी रक्कम | | | अनुदान व फायदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | हप्ता क्रमांक | रक्कम रूपये | टप्पा | |
| | | | | ३.लाभार्थीचे राहते घर कच्चे असावे | | ३ | ३००००/- | विट बांधकाम छत पातळी पर्यत पुर्ण झाल्यानंतर | दिल्यावर व रोजगार सेवकाने कामसुरू असतांना वेळेवर मस्टर पं.स कार्यालयाकडे दिल्यास काढण्यात येते. सदर मजुरी लाभार्थीच्या बँक खात्यामध्ये राज्य शासनाकडून PFMS व्दारे ऑनलाईन जमा करण्यात येते. (सन २१-२२ मध्ये २४८/- मजुरी) (पहिले मस्टर-२८ दिवसांचे जोतापुर्ण झाल्यानंतर रक्कम रूपये -६९४४/-, दुसरे मस्टर - २४ दिवसांचे छज्जा पातळी पुर्ण झाल्यानंतर रक्कम रूपये ५९५२/-,तिसरे मस्टर - १० दिवसांचे छतपातळी पुर्ण झाल्यानंतर रक्कम रूपये २४८०/-- व चौथे मस्टर -२८ दिवसांचे शौचालय पुर्ण झाल्यानंतर रक्कम रूपये ६९४४/- असे एकूण रक्कम रूपये २२३२०/- अकुशल मजुरी दिली जाते) |
| | | | | ४. घरकुलासोबत शौचालय बांधकाम करणे आवश्यक आहे. | | ४ | ५०००/- | शौचालयासह पुर्ण घरकुल बांधकाम झाल्यानंतर अंतिम हप्ता | लाभार्थी कडे जागा उपलब्ध नसल्यास पंडीत दीनदयाल उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना. |
| | | | | ५. घरकुल बांधकामासाठी लाभार्थ्याकडे स्वतःची जागा असणे आवश्यक | | महात्मा गांधी रोजगार हमी योजनेतुन अभिसरणाअंतर्गत शासनाच्या प्रचलित मजुरीच्या दरानुसार अकुशल मजुरी देण्यांत येते (सन २१-२२ मध्ये २४८/- मजुरी ) | | | ग्राम विकास विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक इंआयो/२०१५/प्र.क्र.२००/यो-१० दिनांक ३०/१२/२०१५ अन्वये सन २०१५-२०१६ पासून दारिद्रय रेषेखालील लाभार्थ्यांना केंद्र शासन रक्कम रुपये १०,०००/- व राज्य शासन रक्कम रुपये ४०,०००/- असे एकुण रक्कम रुपये ५०,०००/- जागा खरेदीसाठी अर्थसहाय्य असून जागेचे क्षेत्र प्रति लाभार्थी ५०० चौरस फुट असलेली जागा लाभार्थीच्या नावावर हस्तांतरीत झाल्यानंतर घरकुल बांधकामास मान्यता घेतल्यानंतर घरकुल बांधकामासाठी अनुदान अनुज्ञेय आहे. मोठया ग्रामपंचायतीमध्ये ५०० चौरस फुटापर्यंत २ किंवा ३ लाभार्थींच्या संमतीने दोन मजली (G+१) किंवा तीन मजली (G+२) बांधण्यासाठी प्रती लाभार्थी रक्कम रुपये ५०,०००/- एवढे अर्थसहाय्य अनुज्ञेय आहे. |
| | | | | | | मजुरी | २२३२०/-- | २८ दिवस पहिले मस्टर २४ दिवस दुसरे मस्टर १० दिवस तिसरे मस्टर २८ दिवस चौथे मस्टर असे एकुण ९० दिवसाची अकुशल मजुरी प्रति दिन देण्यांत येते | |
| | | | | | | एकूण लाभ | १४२३२०/- | | |